राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०१७
दि. १८ सप्टेंबर, २०१७

# A

← संच क्रमांक

**2017**

**YO9**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET NO.** 105137

**प्रश्नपुस्तिका-2**

**मराठी व इंग्रजी**

**वेळ : 1 ( एक ) तास**

**एकूण प्रश्न : 100**

**एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे ↑ | | | | | | | ↑ शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

SEAL

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. वाक्यातील क्रियापदाचे रूप आशीर्वाद, आज्ञा, प्रार्थना, विनंती किंवा उपदेश याविषयी अर्थबोध घडवित असेल तर अशा वाक्यांना काय म्हणतात ?

(1) स्वार्थी (2) नकारार्थी (3) विध्यर्थी (4) आज्ञार्थी

---

2. 'बातमी सांगणारा' या शब्दसमूहासाठी वापरला जाणारा एक शब्द खालीलपैकी कोणत्या वाक्यात आला आहे. ते अचूक निवडा.

(1) अजय हा एक चांगला वार्ताहर आहे.

(2) रमेश सकाळ वृत्तपत्रासाठी बातमीदार म्हणून काम करतो.

(3) उमेश हा एबीपी माझा या वृत्तवाहिनीचा उत्तम बातमीदार आहे.

(4) महेश हा नामांकित वृत्तनिवेदक आहे.

---

3. योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (a) | आकाशाला गवसणी घालणे | (i) | सर्व बाजुंनी संकटे येणे |
| (b) | आकाशपाताळ एक करणे | (ii) | नाहक आरडाओरडा करणे |
| (c) | आकाशाची कुऱ्हाड पडणे | (iii) | शक्ती बाहेरची गोष्ट करून पाहणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) |
|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (ii) | (i) | (iii) |
| (3) | (i) | (ii) | (iii) |
| (4) | (iii) | (i) | (ii) |

---

4. खाली दिलेल्या म्हणी व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | आनंद गगनात न मावणे | (i) | मनाला फार लागणे |
| (b) | दुधात साखर पडणे | (ii) | अत्यानंद होणे |
| (c) | नाकाला मिरच्या झोंबणे | (iii) | केलेल्या सर्व गोष्टी वाया जाणे |
| (d) | सगळे मुसळ केरात | (iv) | आनंदात भर पडणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

5. म्हणी व त्यांचा अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (a) | तारे तोडणे | (i) | नवल वाटणे |
| (b) | तोंड टाकणे | (ii) | फार जवळ येणे |
| (c) | तोंडात बोट घालणे | (iii) | वेड्यासारखे बोलणे |
| (d) | तोंडावर येणे | (iv) | अद्वातद्वा बोलणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

6. जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | ऱ्हस्व स्वर | (i) | य, र |
| (b) | संयुक्त स्वर | (ii) | अ, इ |
| (c) | सजातीय स्वर | (iii) | ए, औ |
| (d) | अर्ध स्वर | (iv) | अ, आ |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

7. पुढील विधाने वाचा.

(a) कर्तरी प्रयोगात क्रियापद हे कर्त्याच्या तंत्राप्रमाणे चालते.

(b) कर्मणी प्रयोगात कर्ता हा प्रथमान्त कधीच नसतो.

(c) भावे प्रयोगात कर्ता किंवा कर्म हे दोन्ही गौण असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर

(2) (a), (b) व (c) बरोबर

(3) फक्त (b) चूक, (a) व (c) बरोबर

(4) (a), (b) व (c) चूक

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

8. खालील वाक्याचे योग्य असे नकारार्थी वाक्य निवडा.

'दोन हजार रुपये ही देखील मोठी रक्कम आहे.'

(a) दोन हजार रुपये ही फार मोठी रक्कम नाही.

(b) दोन हजार रुपये ही देखील फार मोठी रक्कम नाही.

(c) दोन हजार रुपये ही काही लहान रक्कम नव्हे.

(d) दोन हजार रुपये ही लहान रक्कम नव्हे का ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) बरोबर, (b), (c), (d) चूक
(2) केवळ (b) बरोबर, (a), (c), (d) चूक
(3) केवळ (c) बरोबर, (d), (a), (b) चूक
(4) केवळ (d) बरोबर, (a), (b), (c) चूक

---

9. खालील वाक्यातील स्वरूपदर्शक उभयान्वयी अव्यय ज्या वाक्यात आहे ते वाक्य कोणते ते सांगा.

(1) यश मिळो की न मिळो आम्ही प्रयत्न करणार.

(2) माझा पहिला नंबर आला, की मी पेढे वाटीन.

(3) तो इतका खेळला, की त्याचे अंग दुखू लागले.

(4) लोकमान्य टिळक म्हणत, की 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.'

---

10. खालील वाक्ये वाचून योग्य पर्याय निवडा.

(a) एकाक्षरी शब्दाचे सामान्यरूप होत नाही.

(b) परकीय भाषेतील शब्दांचे सामान्यरूप केंव्हा केंव्हा होत नाही.

(c) ग्राम किंवा देशवाचक विशेषनामाचे केंव्हा केंव्हा सामान्यरूप होत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर आहेत
(2) फक्त (b) व (c) बरोबर आहेत
(3) (a), (b), (c) बरोबर आहेत
(4) (a), (b) चूक व (c) बरोबर आहे

---

11. खाली दिलेले वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | अंकित करणे | (i) | सर्व बाजूंनी संकटे येणे |
| (b) | अंग झाडून मोकळे होणे | (ii) | शेवट होणे |
| (c) | इतिश्री होणे | (iii) | संबंध तोडणे |
| (d) | आकाश फाटणे | (iv) | पूर्णपणे ताब्यात घेणे. |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iii) | (ii) | (iv) | (i) |

---

12. प्रतिक्षण, महादेव, आजन्म, तोंडपाठ यापैकी तत्पुरुष समासाचे शब्द ओळखा.

(1) महादेव; तोंडपाठ (2) प्रतिक्षण; आजन्म (3) प्रतिक्षण; महादेव (4) आजन्म; तोंडपाठ

---

13. खाली मराठी व्याकरणातील संधीचे काही प्रकार व त्यांची उदाहरणे दिली आहेत. योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | सजातीय | (i) | प्रीत्यर्थ |
| (b) | गुणादेश | (ii) | सदैव |
| (c) | वृद्ध्यादेश | (iii) | महिलाश्रम |
| (d) | यणादेश | (iv) | गणेश |

उत्तरासाठी खालीलपैकी योग्य पर्याय निवडा :

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (i) | (iii) | (iv) |

---

14. संबोधन दर्शविताना कोणते विरामचिन्ह वापरतात ?

(1) अर्धविराम (2) स्वल्पविराम (3) अपूर्ण विराम (4) उद्गार चिन्ह

---

**15.** जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | उंबराचे फूल | (i) | सत्ता बदल करणे |
| (b) | भरतवाक्ये म्हणणे | (ii) | संबंध जुळणे |
| (c) | खांदेपालट करणे | (iii) | क्वचित भेटणारी व्यक्ती |
| (d) | तार जुळणे | (iv) | सुरुवात करणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

---

**16.** वाचा व बरोबर असलेला पर्याय निवडा.

(a) ट्, ठ्, प्, फ् ही मृदू व्यंजने आहेत.

(b) ग्, घ्, ब्, भ् ही कठोर व्यंजने आहेत.

(c) ण्, ङ्, म्, न् ही अनुनासिके आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) बरोबर, (b), (c) चूक

(2) केवळ (b) बरोबर, (a), (c) चूक

(3) केवळ (c) बरोबर, (a), (b) चूक

(4) (a), (b) व (c) बरोबर

---

**17.** पुढील विधाने वाचा.

(a) कर्मणी प्रयोगात कर्ता प्रथमान्त असतो.

(b) कर्मकर्तरी प्रयोगालाच नवीन कर्मणी असे म्हणतात.

(c) 'त्याची गोष्ट लिहून झाली' हे समापन कर्मणी प्रयोगाचे उदाहरण आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) चूक

(2) फक्त (a) चूक

(3) फक्त (b) व (c) चूक

(4) (a), (b) व (c) बरोबर

---

18. 'महादेव पाटलांच्या घराची भिंत पडून मोठे नुकसान झाले. पण त्याचवेळी त्यांच्या मुलाला नोकरीचा हुकूम आला'. या प्रसंगाला अनुसरून खालीलपैकी योग्य म्हण कोणती ?

(1) आजा मेला नातू झाला. (2) आकाश ठेंगणे वाटणे.

(3) डोंगर पोखरुन उंदीर काढणे. (4) आनंद गगनात न मावणे.

---

19. खाली चार शब्द दिले आहेत त्यातील शुद्धलेखन नियमांनुसार योग्य रूप कोणते ?

(1) अस्मानि सूलतानी (2) आस्मानी सुलतानी (3) अस्मानीसुलतानी (4) अस्मानीसुलतानि

---

20. 'क्रियाविशेषण' हे क्रियापदाचे विशेषण असते. पण ते विकारी असते.' या वाक्याचा विचार करून खाली दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडा.

(1) फक्त पहिले वाक्य बरोबर आहे. (2) फक्त दुसरे वाक्य बरोबर आहे.

(3) दोन्ही वाक्ये चूक आहेत. (4) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

---

21. 'सरांनी विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार शिकवले.'

या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.

(1) उभयविध क्रियापद (2) प्रयोजक क्रियापद

(3) शक्य क्रियापद (4) द्विकर्मक क्रियापद

---

22. पुढील विधाने वाचा व योग्य पर्याय निवडा.

(a) एकत्र येणाऱ्या वर्णातील पहिला विसर्ग व दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असेल तर त्यास विसर्गसंधी म्हणतात.

(b) एकमेकांशेजारी येणारी वर्ण हे जर ने जोडले असतील तर त्याला स्वरसंधी म्हणतात.

(c) जवळ-जवळ येणाऱ्या वर्णापैकी दोन्ही वर्ण व्यंजने व दूसरा वर्ण स्वर असेल तर त्याला व्यंजनसंधी म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर आहे. (2) (b) व (c) बरोबर आहे.

(3) (a), (b) व (c) चूक आहे. (4) (a), (b) व (c) बरोबर आहे.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

23. खालील विधाने वाचा व योग्य उत्तर निवडा.

(a) संगीतातील राग गाण्यासाठी केलेल्या काव्याला धृवपद म्हणतात.

(b) संगीतातील राग गाण्यासाठी केलेल्या काव्याला चीज म्हणतात.

(c) संगीतातील राग गाण्यासाठी केलेल्या काव्याला कडवं म्हणतात.

(d) संगीतातील राग गाण्यासाठी केलेल्या काव्याला गीतरचना म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (a) आणि (b) बरोबर
(3) फक्त (b) बरोबर
(4) फक्त (a) आणि (c) बरोबर

---

24. म्हणी व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | कानामागून आली व तिखट झाली | (i) | गोष्ट जवळ असताना इतरत्र शोधणे. |
| (b) | गोगलगाय अन् पोटात पाय | (ii) | लहान माणसे अल्पसंतुष्ट असतात. |
| (c) | काखेत कळसा गावाला वळसा | (iii) | बाहेरून गरीब आतून कपटी |
| (d) | कोल्हा काकडीला राजी | (iv) | मागून येऊन वरचढ होणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (ii) | (i) | (iii) | (iv) |

---

25. 'अमृत' या शब्दाला समानार्थी शब्द निवडा.

(a) सुधा (b) पीयुष (c) संजीवनी (d) गोड

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) व (b) बरोबर, (c) व (d) चूक

(2) केवळ (b) व (c) बरोबर, (a) व (d) चूक

(3) केवळ (c) व (d) बरोबर, (a) व (b) चूक

(4) केवळ (c) बरोबर, (a), (b) व (d) चूक

---

26. (a) सर्वनामाला स्वत:ची वेगळी लिंग, वचन अशी ओळख असते.

(b) सर्वनामाचे लिंग अथवा वचनातील रूप ते ज्या नामाच्या जागी येते त्यावरुन निश्चित होते.

या दोन्ही वाक्याचा विचार करून पर्याय निवडा.

(1) दोन्ही वाक्ये चुकीची आहेत. (2) फक्त पहिले वाक्य बरोबर आहे.

(3) फक्त दुसरे वाक्य बरोबर आहे. (4) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

---

27. पुढील विधाने वाचा.

(a) उपसर्ग म्हणजे पूर्व प्रत्यय होत.

(b) उपसर्ग हे अव्ययरूप असून ते मूळ शब्द किंवा धातुंचा अर्थ फिरवतात.

(c) उपसर्ग हे वाक्यात स्वतंत्रपणे येऊ शकतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर (c) चूक (2) (b) व (c) बरोबर (a) चूक

(3) (a) व (b) चूक (c) बरोबर (4) (c) व (a) चूक (b) बरोबर

---

28. खाली तीन गट दिलेले आहेत. त्यातील बरोबर असलेला गट कोणता ?

(a) स्वरसंधी असलेल्या शब्दांचा गट - प्रीत्यर्थ, प्रत्येक, सदाचार

(b) व्यंजनसंधी असलेल्या शब्दांचा गट -विपत्काल, आजादी, षट्शास्त्र

(c) विसर्गसंधी असलेल्या शब्दांचा गट - यशोधन, मनोरंजन, अधोवदन

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (b) आणि (c) बरोबर (4) (a), (b), (c) बरोबर

---

29. ओकारान्त पुल्लिंगीनामाचे सामान्यरूप _______ होते.

(1) याकारान्त (2) उकारान्त (3) ईकारान्त (4) ओकारान्त

---

30. चतुर्थी विभक्ती प्रत्ययाची कार्ये करणाऱ्या अव्ययांचा गट खाली दिलेल्या गटातून निवडा.

(1) आत, मध्ये, खाली, ठायी, विषयी (2) कडून, करवी, द्वारा, मुळे, योगे

(3) पासून, पेक्षा, शिवाय, खेरीज (4) करीता, साठी, कडे, प्रत

---

31. खालीलपैकी तत्सम शब्दाचा गट ओळखा.

(1) कान, सासू, दूध, ओठ (2) मंजूर, मालक, झोप, कावळा

(3) तूप, फणस, कापूस, पान (4) कलश, विद्वान, कोमल, पद

---

32. पुढील विधाने वाचा.

(a) विशेषनामे व भाववाचक नामे ही एकवचनी असतात.

(b) सामान्य नामाचे अनेक वचन शक्य नसते.

(c) सामान्य नामे कधीकधी विशेषनामांचे कार्य करतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) चूक, (b) व (c) बरोबर (2) (a) व (b) बरोबर (c) चूक

(3) फक्त (b) चूक (4) फक्त (c) चूक

---

33. 'आधी जन्मलेला' या शब्दसमूहाबद्दल योग्य तो पर्याय निवडा.

(a) अनुज (b) अग्रज (c) अपूर्व (d) आदिवासी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b) बरोबर (2) (a) बरोबर आणि (c) चूक

(3) फक्त (a) आणि (b) बरोबर (4) फक्त (b) आणि (d) बरोबर

---

34. खालील मराठी व्याकरणातील संधीचे काही प्रकार व त्यांची उदाहरणे दिली आहे त्यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| संधी | | उदाहरण | |
|---|---|---|---|
| (a) | व्यंजन संधी | (i) | महिलाश्रम |
| (b) | अनुनासिक संधी | (ii) | नदीत |
| (c) | पूर्वसंधी | (iii) | वाङ्‌निश्चय |
| (d) | स्वरसंधी | (iv) | सज्जन |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iii) | (ii) | (iv) | (i) |

---

35. "त्याचा धाकटा मुलगा आज क्रिकेटच्या सामन्यात चांगला खेळला." या विधानातील उद्देश्य व विधेय विस्तार बरोबर असलेली शब्द जोडी कोणती ? ते ओळखा.

(1) उद्‌देश्य-धाकटा, विधेय विस्तार-सामन्यात चांगला खेळला.

(2) उद्‌देश्य-त्याचा, विधेय विस्तार-क्रिकेटच्या सामन्यात.

(3) उद्‌देश्य-मुलगा, विधेय विस्तार-आज क्रिकेटच्या सामन्यात.

(4) उद्‌देश्य-त्याचा, विधेय विस्तार-चांगला खेळला.

---

**36.** पुढीलपैकी कोणता शब्द व्याकरणदृष्ट्या बरोबर आहे ?

(1) अर्धोन्मिलित (2) अर्धोन्मीलित (3) अर्धोनम्मिलीत (4) अर्धोउन्मीलित

---

**37.** जोड्या जुळवा.

(a) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय — (i) व्याकरण म्हणजे भाषेच्या रचनेचे शास्त्र होय.

(b) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय — (ii) माझ्याजवळ पैसे नाहीत सबब मी येणार नाही.

(c) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय — (iii) बाळ झोपला की मी लगेच येईन.

(d) संकेतबोधक उभयान्वयी अव्यय — (iv) मुले सुरक्षित घरी यावीत यासाठी रिक्षाने आलो.

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (4) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

---

**38.** जोड्या जुळवा.

(a) अनल — (i) कांता

(b) अही — (ii) मर्कट

(c) भार्या — (iii) भुजंग

(d) कपी — (iv) पावक

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

---

**39.** तो सकाळीच आला म्हणून मी मुंबईला जायचा थांबलो. या वाक्याचा प्रकार कोणता ?

(1) विकल्पबोधक संयुक्त वाक्य (2) परिणामबोधक संयुक्त वाक्य

(3) मिश्र संयुक्त वाक्य (4) समुच्चयबोधक संयुक्त वाक्य

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

40. वरचा मजला, खालची माडी, मागील दार, पुढची गल्ली या शब्दातील वरचा, खालची, मागील, पुढची हे शब्द त्यांच्यापुढे आलेल्या 'मजला','माडी', 'दार', 'गल्ली' या नामांची विशेषणे आहेत. ती वर, खाली, मागे, पुढे या शब्दापासून बनली आहेत. तर ती विशेषणे खालीलपैकी कोणत्या प्रकारची आहेत ?

(1) धातुसाधित विशेषणे
(2) अव्ययसाधित विशेषणे
(3) सर्वनामसाधित विशेषणे
(4) नामसाधित विशेषणे

41. 'लक्ष्मी' या शब्दाला समानार्थी शब्द ओळखा.

(a) कमला (b) रमा (c) वैष्णवी (d) ज्योत्स्ना

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर
(2) (a), (b), (c) बरोबर
(3) फक्त (d) बरोबर
(4) (a), (b), (c), (d) सर्व बरोबर

42. (a) शब्दयोगी अव्यये सामान्यत: नामांना जोडून येत नाहीत.
(b) शब्दयोगी अव्यये क्रियापदे आणि क्रियाविशेषणे यांना केंव्हा केंव्हा जोडून येतात.

वरील दोन्ही वाक्ये काळजीपूर्वक वाचून खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

(1) पहिले वाक्य चूक व दुसरे वाक्य बरोबर आहे.
(2) पहिले वाक्य बरोबर व दुसरे वाक्य चूक आहे.
(3) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.
(4) दोन्ही वाक्ये चूक आहेत.

43. 'समाजात वावरणारे असले '<u>साप</u>' ठेचून काढले पाहिजेत' या वाक्यातील 'साप' या शब्दाला कोणती शब्दशक्ती प्राप्त झाली आहे ?

(1) वाच्यार्थ (2) लक्षणा (3) व्यंजना (4) अभिधा

44. 'बोका' शब्दाचा लिंग बदल सूचित करणारा शब्द कोणता ?

(a) बोकी (b) भाटी (c) बोकीन (d) भाटीन

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर
(2) फक्त (b) बरोबर
(3) फक्त (a) व (c) बरोबर
(4) (a), (b), (c), (d) बरोबर

45. 'राजाने शत्रूला युद्धात हरवूनही शत्रू सैन्याला अभय दिले.' या वाक्यात आलेल्या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायी उत्तरातून अचूक निवडा.

(1) शत्रूला आपल्यात राहण्यास सांगितले.
(2) शत्रूच्या पोटापाण्याची काळजी घेण्यास सेनापतीला सांगितले.
(3) शत्रूला सुरक्षितपणाची हमी दिली.
(4) शत्रूला थांबण्यासाठी / राहण्यासाठी जागा दिली.

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**खाली दिलेल्या परिच्छेद वाचून प्रश्न क्रमांक 46 ते 50 ची उत्तरे लिहा.**

युवकांचे वाढते सामान्यज्ञान, स्पर्धात्मक परीक्षांमुळे घडणारी बुद्धीची मशागत, दैनंदिन जीवनात प्रसंगपरत्वे घडणाऱ्या सहज चर्चेमुळे वाढणारा आवाका या गोष्टी व्यक्तीच्या वक्तृत्वक्षमतेचे संगोपन करण्यास साह्यभूत झाल्याशिवाय राहणार नाहीत.

फक्त एक भीती आहे. दिवसेंदिवस साधनशरणता वाढते आहे. कोणतीही गोष्ट करवून घेण्याकडे सर्वांचा कल आहे. पूर्वी गणिताचा काही भाग तोंडीच उरकला जात असे. आता गुणाकार, भागाकार व बेरीज यासाठीसुद्धा हाती उपकरण लागते आहे. स्वत: करणे किंवा करून पाहणे वृत्तीत राहिले नाही. जीवनाच्या सर्व क्षेत्रात बसून पाहणे किंवा पाहत बसणे हा भाव बळावत चालला आहे. माणसे कर्तेपणापासून दूर जात चालली आहेत. मैदानात न उतरता खेळाडू होणार कसा ? आखाड्यात पाऊल न टाकता मल्ल होणार कसा ? शस्त्र न हाताळता सैनिक होणार कसा ? पीठ न मळता स्वयंपाक करणार कसा ? कल्पवृक्षाची झाडे लावून व त्याखाली बसून मनोरथाची पूर्तता करून घेण्याचा सुलभ मार्ग केवळ स्वप्नसृष्टीतच असू शकेल. प्रत्यक्ष वहिवाटली जाणारी पायाखालची वाट खडतर असते, हे ठेचा लागल्यावरच कळते. नव्या पिढीला वक्तृत्व मार्गावरच्या ठेचा अनुभवाव्या लागतील. टाकीचे घाव घ्यावे लागतील.

अंगी पात्रता असूनही घडणारी उपेक्षा सहन करावी लागेल. वक्तृत्वाच्या क्षेत्रातही प्रस्थापितांचे चक्रव्यूह भेदून आत शिरावे लागेल. विद्याव्यासंगाची कवचकुंडले धारण करून मोठ्या निर्धाराने पुढे जावे लागेल. मैफलीच्या निमंत्रणाची वाट न पाहता आपल्याच मनात एक मैफल भरवून रियाझ करणाऱ्या गायकाच्या निष्ठेने प्रसंगी आपल्याच मनाशी बोलत राहिले पाहिजे. कोणत्याही सामन्यात कधीही खेळता आले नाही व पुढेही कदाचित मिळणार नाही हे माहीत असूनही बॅट परजून कोठेही खेळात रममाण होणाऱ्या क्रीडाप्रेमी क्रिकेटवीराची तन्मयता वक्त्याच्या अंगी असली पाहिजे. मुलामुलींनी वारंवार मनात डोकावून पाहावे व भेटेल त्या व्यक्तीशी मनोभावे बोलावे. उगाच पाल्हाळ माजवू नये. अकारण आखडते घेऊ नये. चालणाराची पावले नकळत पडत राहतात. जेथे पोचायचे ती जागा दिसताक्षणी ती आपोआप थांबतात. कधी ती माजघराजवळ थांबतील. कधी ती कार्यालयाजवळ स्थिरावतील. कधी एखाद्या मंदिराजवळ, तर कधी बसस्टॉपजवळ ती आपोआप थांबतील. निघणे, चालणे, पोचणे व थांबणे या क्रिया सहज व विनासायास घडतात. हे कर्मकौशल्य अंगी बाणले म्हणजे चालता चालता माणूस जगाचा प्रवासी होतो.

बोलण्याच्या बाबतीत तसेच काही घडू शकते. माणसांच्या या जगात सतत माणसे भेटत राहतात. मित्र, शेजारी, भावंडे, आप्तस्वकीय, गुरुजन, पाहुणे, मार्गावरचे परिचित व अपरिचित, या सर्वांशी कारणपरत्वे बोलावे लागतेच. ते बोलणे साक्षीत्वाने, तन्मयतेने, निरामय तटस्थतेने आणि तरीही तल्लीनतेने करण्याची सवय लावून घेतली, तर अंतर्यामी वक्तृत्वाचा एक वेलू मूळ धरील. नकळत तो गगनाकडे वळेल. मग गगन हेच त्याचे सदन होईल.

---

46. वक्तृत्व क्षमतेचे कौशल्य विकसित करण्यासाठी साह्यभूत ठरणाऱ्या खालीलपैकी कोणत्या गोष्टी उताऱ्यात दिल्या आहेत ?

(a) युवकांचे वाढते सामान्यज्ञान

(b) स्पर्धात्मक परीक्षांमुळे घडणारी बुद्धीची मशागत

(c) वाढती साधनशरणता

(d) दैनंदिन जीवनात प्रसंगपरत्वे घडणाऱ्या सहज चर्चा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (d) (2) (a), (b), (c) (3) (b), (c), (d) (4) (a), (b), (c), (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

47. कोणती कर्मकौशल्ये अंगी बाणली म्हणजे चालता चालता माणूस जगाचा प्रवासी होतो ?

(a) निघणे, चालणे (b) बोलणे, चालणे

(c) पोचणे, थांबणे (d) नियोजन करणे थांबणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) (2) (a) व (c) (3) (d) व (a) (4) (b) व (c)

---

48. उताऱ्यासाठी सुयोग्य शीर्षक कोणते ?

(1) तन्मयता (2) वक्तृत्वकला कशी जोपासाल ?

(3) निष्ठा आणि तन्मयता (4) वक्तृत्वकला आणि इतर कला

---

49. लेखकाला कशाची भीती वाटत आहे ?

(1) गुणाकार, भागाकार व बेरीज यांसाठी उपकरणे लागत आहेत याची.

(2) स्वत: करणे किंवा करुन पाहणे वृत्तीत राहिले नाही, याची.

(3) समाजात साधनशरणता वाढत आहे, याची.

(4) माणसे कर्तेपणापासून दूर चालली आहेत, याची.

---

50. खालीलपैकी कोणती विधाने असत्य आहेत ?

(a) जीवनाच्या सर्व क्षेत्रात बसून पाहणे किंवा पाहत बसणे हा भाव बळावत चाललेला नाही.

(b) माणसे कर्तेपणापासून दूर चालली आहेत.

(c) दिवसेंदिवस साधनशरणता वाढते आहे.

(d) माणसांच्या या जगात सतत माणसे भेटत राहतातच असे नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) (a) आणि (d) (3) (c) आणि (d) (4) (b) आणि (c)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

51. "The sun rises in the east," he said.

Which of the following sentence/s is/are correct indirect narration of the above sentence :

(1) He told me that the sun rises in the east.

(2) He told me that the sun rose in the east.

(3) He tells me that the sun rises in the east.

(4) He tells me that the sun rose in the east.

---

52. Fill in the blank with the correct alternative :

His enthusiasm is starting to ________ the rest of us.

(1) rub off with (2) rub off on

(3) rub off along (4) rub off through

---

53. Identify the correct sentence/s :

(a) He is desirous for going abroad.

(b) He is desirous to go abroad.

(c) He is desirous of going abroad.

**Answer options :**

(1) (a) only (2) (c) only

(3) (b) only (4) both (a) and (b)

---

54. Identify the sentences containing adjective clauses :

(a) She is an author you will not have read.

(b) I must post the letter, I have just written.

(c) They received information that their car had been stolen.

**Answer options :**

(1) (b) only (2) (a) and (c) only

(3) (a) and (b) only (4) (a), (b) and (c)

---

55. Which of the sentences is/are correct ?

(a) our water meter is one metre.

(b) our water metre is one meter.

(c) our water meter is one meter.

**Answer options :**

(1) (a) only (2) both (a) and (c)

(3) (b) only (4) both (a) and (b)

---

56. Which one of the following phrases means 'Regicide' ?

(a) Murder of mother (b) Murder of father

(c) Murder of a king (d) Murder of brother

**Answer options :**

(1) Both (a) and (b) (2) (d) only

(3) (b) only (4) (c) only

---

57. Choose the most appropriate phrase for the underlined words :

She read the document quickly while having tea.

(1) ran up (2) ran across (3) ran through (4) ran down

---

58. Cover your head properly lest you _________ catch cold.

Which of the following modals fills correctly the blank in the sentence above ?

(1) will (2) would (3) shall (4) should

---

59. Choose the correct expression to fill in the blank :

He said it with his _________.

(1) tongue out of his cheek. (2) tongue in his cheek.

(3) tongue below his cheek. (4) tongue on his nose.

---

60. Identify the **correct** sentence is :

(a) If I had time, I should have visited the exhibition.

(b) If there was a rush of orders, we had to work overtime.

(c) If I were a millionaire I would give generously to good causes.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b)

(3) Only (c) (4) Only (b) and (c)

---

61. Choose the correct pair of words to fill in the blanks :

(a) It was a _________ choice.

(b) The _________ proceedings are over.

**Answer Options :**

(1) judicial, judicious (2) judicious, judicial

(3) judicious, judicious (4) judicial, judicial

---

62. Choose the correct expression to fill in the blank :

The work is, to all _________ finished.

(1) intents and purposes (2) intent and purpose

(3) intensity and purpose (4) intentions and purposes

---

63. Identify the correct meaning of the underlined word :

He has lost none of his political <u>touch</u>.

(1) affect (2) contact (3) Expertise (4) pinch

---

64. He proved his _________ by facing the situation with supreme tact and confidence. Which one of the following words fills correctly the blank in the sentence above ?

(a) Metal (b) Mettle (c) Mettel (d) Meatal

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) only

(3) Both (c) and (d) (4) (d) only

---

65. Choose the most appropriate option for the underlined phrase :

Please keep this information under your hat.

(1) in the mind (2) on the top (3) secret (4) ready for use

66. Which of the given options comes nearest in meaning to the underlined word ?

The suffrage was clearly for change.

(1) vote (2) pain (3) inconvenience (4) effort

67. Identify the parts of speech of the underlined word :

He is a fast talker.

I was observing a fast.

Muslims fast during the Ramadhan.

She drove fast.

**Answer options** : Respectively :-

(1) Adjective, adverb, noun, verb (2) Adverb, verb, noun, adjective

(3) Adjective, noun, verb, adverb (4) Adjective, noun, adverb, verb

68. Choose the correct sentence/s :

(a) I entered the third class compartment.

(b) At the same time the train was come to a stop.

(c) I looked out of the window and everyone were asking who had pulled the chain.

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (b) and (c) only

(3) (a) only (4) (a), (b) and (c)

69. Choose the correct sentence/s :

(a) We too have been wanting to see you.

(b) We too have wanting to see you.

(c) I haven't been seeing such a lovely place.

**Answer options :**

(1) (a) and (c) only (2) (a) only

(3) (c) only (4) (a), (b) and (c)

70. Which one of the following words spells correctly ?

(1) Miscallenous (2) Miscellenous

(3) Miscellaneous (4) Miscallaneous

71. I hope to be _________ doctor.

Which of the following articles fills correctly the blank in the sentence above ?

(1) a (2) an (3) the (4) None of the above

72. Fill in the blanks from the alternatives given below :

(a) Barley, wheat and rice _________ cereals.

(b) Twenty miles _________ not a great distance in these days of rapid travel.

**Answer options :**

(1) is, is (2) is, are

(3) are, is (4) are, are

73. Choose the correct alternative to fill in the blanks :

(a) ________, you can cook some good dishes.

(b) ________, you could have cooked some good dishes.

**Answer options :**

(1) If you learnt to cook well, If you had learnt to cook well

(2) If you had learnt to cook well, If you learnt to cook well

(3) If you learn to cook well, If you had learnt to cook well

(4) If you had learnt to cook well, If you learn to cook well

---

74. If he works satisfactorily, he will be promoted.

The condition expressed in the sentence above is ________.

(1) improbable condition (2) impossible condition

(3) probable condition (4) imaginery condition

---

75. Identify the noun clause/s in the following sentences :

(a) We decided that we would buy the house.

(b) My theory is that he forged the will.

(c) We cannot provide seats for all who may come.

**Answer options :**

(1) (a) only (2) (a) and (b) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

76. Choose the correct substitute for the words printed in capitals :

She recalled with a wistful smile the HALCYON DAYS of her youth.

(1) time of rivalry (2) time of challenges

(3) time of peace and happiness (4) time of turmoil

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

77. Match the following :

| | A | | B |
|---|---|---|---|
| (a) | Infirmary | (i) | a home for orphans |
| (b) | Orphanage | (ii) | a place for ammunition and weapons |
| (c) | Arsenal | (iii) | a place for dogs |
| (d) | Kennel | (iv) | a home for old persons |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (iv) | (i) | (iii) | (ii) |

---

78. She was tired.

She still went on working.

Which of the following sentence/s change/s the above sentences correctly into a complex sentence ?

(a) Although she was tired she still went on working.

(b) She was tired but she still went on working.

(c) She still went on working despite she was tired.

(d) She still went on working in spite she was tired.

**Answer options :**

(1) Both (c) and (d) (2) (a) only

(3) (b) only (4) (c) only

---

79. Identify the sentences having abstract noun/s in them.

(a) He had no friends or relations and lived in solitude.

(b) We were rivals, but I felt no enmity for her.

(c) Their navy consists of over sixty ships.

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (a) and (c) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

80. Choose the wrongly spelt words :

(a) NEVERTHLESS (b) EQUANIMITY (c) REPERTOIR

**Answer Options :**

(1) (a) and (c) only (2) (b) and (c) only

(3) (b) only (4) (a), (b) and (c)

---

81. Which of the word/s is/are opposite in meaning to the word printed in capitals in the given sentence ?

He is an ASTUTE businessman.

(a) Simpleton (b) Shrewd (c) Foolish

**Answer Options :**

(1) (a) and (b) only (2) (b) and (c) only

(3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

82. The small child was crying for _________ mother.

Fill in the blank with correct pronoun.

(1) her (2) his (3) its (4) my

---

83. What he said is true

The underlined clause in the sentence above is a/an _________.

(1) noun clause (2) adjective clause

(3) adverb clause (4) main clause

---

84. (i) I wish my brother were here.

(ii) I wished my brother had been here.

The above pair of sentences expresses _________.

(a) past situation (b) real situation

(c) possible situation (d) hypothetical situation

**Answer options :**

(1) both (c) and (d) (2) (a) only

(3) (b) only (4) (d) only

---

85. Choose the best among the options to fill in the blank :

She _________ better improve her manners.

(1) had (2) should (3) must (4) can

---

86. Choose the correct sentence/s :

(a) When you are leaving ?
(b) Where are you going ?
(c) What I can do for you ?

**Answer options :**

(1) (a) and (b) only
(2) (c) only
(3) (b) only
(4) (a), (b) and (c)

---

87. Among the given options, identify the correctly spelt word :

(1) vaccination
(2) Vaccinnation
(3) both (1) and (2) are correct
(4) both (1) and (2) are incorrect

---

88. We are going to discuss all the issues in detail.

The underlined expression in the sentence above reveals ________.

(1) definite future
(2) immediate future
(3) remote future
(4) possible future

---

89. Identify the correct sentence :

(1) The price is depended on the quality.
(2) The price is made to depend on the quality.
(3) The price depends on the quality.
(4) The price was depended on the quality.

---

90. The tiger set on the deer and tore it into pieces.

The underlined phrase in the sentence above means ________.

(1) settled
(2) broke
(3) invited
(4) attacked

---

91. Match the following to fill in the blanks :

(a) What ________ I do for you ? (i) may
(b) ________ you like to go by air, sir ? (ii) could
(c) If you ________ tell me the exact date of your journey. (iii) can
(d) You ________ have to accept the booking. (iv) would

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

92. Which word/s is/are similar in meaning to the word printed in capitals in the given sentence ?

She was completely FLUMMOXED by the second question.

(a) Confuse (b) Bewilder (c) Pacify

**Answer Options :**

(1) (c) only (2) (a) and (b) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

93. Identify the sentence (s) in imperative mood :

(a) God bless you.

(b) Long live the king.

(c) Hurry up !

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b)

(3) Only (c) (4) Only (a) and (b)

---

94. Identify the correct sentence/s :

(a) The ship was wrecked and every man, woman and child was drowned.

(b) The ship was wrecked and every man, woman and child were drowned.

(c) The ship was wrecked and every man, woman and child had drowned.

**Answer options :**

(1) (b) only (2) (c) only

(3) (a) only (4) both (b) and (c)

---

95. She _________ understand today's lecture.

Which of the following modals fills correctly the blank in the sentence above ?

(a) cannot (b) may not (c) could not (d) should not

**Answer options :**

(1) both (b) and (c) (2) (a) only

(3) (d) only (4) (c) only

---

**Read the following passage carefully and answer question numbers 96 to 100 based on it.**

There are two considerations which deserve at least a word in any discussion of the future of the Indian theatre. The first is the rapid development of the cinema as a competition for popular favour. At first in the early flush of cinematic triumph, people- some of whom might have been expected to know better - prophesied the extinction of the theatre. It is now clear that though here and there, temporarily, the theatre may be affected, the cinema can never hope to replace the stage and elbow it out of existence. Experience in the West has shown that the stage will always be required as a feeder to the studio. For the technique is different and great stage actors have always to their disgust discovered that film-acting is at least only a second best to them; it cannot mean to them what the stage means. Something is lacking, the human touch. In the theatre heart responds to heart, and mind acts on mind in a way unknown to the cinema.

Thus the theatre is in no danger of extinction. On the other hand, the rivalry of the screen ought to and will put the theatre to a new test and give it a new stimulus that may well lead to still higher planes of artistic achievements.

Finally, a word about what a national language, spoken, written and thought might do for the theatre in India. With new awakening in social life the need for a common tongue is being increasingly felt. Much work is being done to hammer out a common linguistic medium. The day when it is accepted will be a great day for the Indian theatre, as it will be for all art in the country. But the theatre, because its life-blood is the spoken word, will gain most. With a common tongue, with a live national consciousness, the theatre will come into its own as a definite instrument of national unity, reflecting the national mind, interpreting the national heart and dreaming national dreams for the future.

---

**96.** What will be the effect of evolution of a common national language on theatre ?

(a) The theatre will become an instrument of national unity.

(b) The theatre will be most benefited by common language.

(c) The theatre will be able to dream national dreams.

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) and (c) only

(3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

**97.** Choose the statements which are true in the context of the passage :

(a) Cinema initially posed competition for theatre.

(b) Cinema will replace theatre one day.

(c) Theatre is a feeder to cinema.

**Answer options :**

(1) (b) only (2) (a) and (b) only

(3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

98. What is the difference between cinema and theatre according to the passage ?
   (a) Film-acting is not the same as stage acting.
   (b) Film acting lacks human touch.
   (c) In cinema, heart responds to heart.

   **Answer options :**
   (1) (a) and (b) only (2) (a) and (c) only
   (3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

99. Why is the need for common national language felt ?
   (1) Due to English being a difficult language.
   (2) Due to new awakening in social life.
   (3) Due to lack of language teaching facilities.
   (4) Due to examination policy of High School Boards in the country.

---

100. Which statement/s is/are true about the rivalry between cinema and theatre ?
   (a) It will give theatre a new stimulus.
   (b) It will lead to extinction of theatre.
   (c) It will encourage higher artistic achievements of theatre.

   **Answer options :**
   (1) (b) and (c) only (2) (b) only
   (3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

-o0o-

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

## सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

SEAL